# बृहन्मुंबई महानगरपालिका

शेठ व्ही.सी.गांधी आणि एम.ए.व्होरा महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय, राजावाडी, घाटकोपर (पू.), मुंबई – ४०००७७.

क्र. एच.ओ./आर.जी.एच./ १४७४० /आस्था - ०१ दिनांक १४/०९/२०२३.

# सूचना

राजावाडी रूग्णालयाच्या आस्थापनेवरील कार्यकारी सहाय्यक (लिपिक) या संवर्गाची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरिता खालील अर्हताप्राप्त असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

- **भरावयाची एकूण पदे :-** ०३
- **मानधन :-** रू.२०,०००/-
- **शैक्षणिक अर्हता :-**
  १. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परिक्षा १०० गुणांचे मराठी व १०० गुणांचे इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.
  २. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वाणिज्य कला किंवा तत्सम शाखेचा पदवीधर असावा आणि प्रथम प्रयत्नात किमान ४५% गुणांसह उत्तीर्ण असावा.
  ३. उमेदवाराने शासनाची इंग्रजी व मराठी टंकलेखनाची प्रत्येकी किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगाची परिक्षा उत्तीर्ण असावा.
  ४. उमेदवार MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असावा.
- **अर्ज करण्याचा कालावधी :-** **दि. १५/०९/ २०२३ ते दि. २२/०९/ २०२३**
- **मुलाखतीचा दिनांक :-** **दि. २६/०९/ २०२३**

अर्जदारांनी अर्ज **दि. १५/०९/ २०२३ ते दि. २२/०९/ २०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत राजावाडी रूग्णालय, घाटकोपर (पूर्व) येथे सादर करावयाचे आहेत. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारत घेतले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. (**अर्जा सोबतची कागदपत्रे साक्षांकीत केलेली असावीत**.)

सदर नियुक्ती **निव्वळ कंत्राटी तत्वावर सहा महिन्यांच्या** कालावधीकरिता अथवा सदर पदांवर कायम तत्वावर उमेदवार प्राप्त होईपर्यंत या पैकी जे अगोदर असेल एवढ्या कालावधीसाठी असेल. त्यांना महानगरपालिका कर्मचा-याप्रमाणे सेवेचे इतर कोणतेही फायदे अनुज्ञेय होणार नाहीत.

**अटी व शर्ती** सोबत जोडल्या आहेत.

***सही***

**वैद्यकीय अधिक्षक**

**राजावाडी रूग्णालय, घाटकोपर**